MHSN050013322017

दाखल तारीख – २८.०४.२०१७

नोंदणी तारीख – २७.०६.२०१७

निकाल तारीख – ०६.०१.२०२४

कालावधी – वर्षे महिने दिवस

०६ ०८ ०८

<u>सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, इस्लामपूर, जि. सांगली, यांचे न्यायालयात</u>

<u>(पिठासीन अधिकारी – जगन्नाथ वाघ)</u>

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ३९०/२०१७</u> <u>निशाणी क्र. ४३</u>

**श्री. यमाईदेवी उरुण इस्लामपूर नोंद ट्रस्ट**

( नोंदणी क्रमांक ए–४५५ सांगली )

ता.वाळवा, जि. सांगली. तर्फे–अधिकारप्राप्त विश्वस्त

श्री. मधुकर नाना गुरव (मयत )

**१/१ श्री. अनिल मधुकर गुरव,**

वय–४४ वर्षे, व्यवसाय– शेती व पूजाअर्चा

**१/२ श्री. महेश मधुकर गुरव,**

वय– ४० वर्षे, व्यवसाय–शेती व पूजाअर्चा

रा. घर नं. १२८०, शंभू आप्पाचे मठाजवळ,

उरुण–इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली.

.. <u>वादी</u>

**–विरुध्द –**

**१.श्रीमती. कलावती प्रल्हाद पोरे,**

वय– ५० वर्षे, व्यवसाय– निवृत्त,

**२. श्री. हेमचंद्र प्रल्हाद पोरे,**
वय–३५ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

**३. श्री. जयदीप प्रल्हाद पोरे,**
वय–३२ वर्षे, व्यवसाय–व्यापार,
सर्व रा. क्लब हाऊस शेजारी, होळकर
डेअरी शेजारी, उरुण–इस्लामपूर,
ता.वाळवा, जि.सांगली.

.. **प्रतिवादी**

**दावा :– मालकी हक्काने मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी** ..........

..........................................................................................................

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे अभियोक्ता | – | ॲड. श्री.एस. ए. जाधव |
| प्रतिवादींतर्फे | – | ॲड. श्री. एच. एस. पवार |

..........................................................................................................

**न्यायनिर्णय**

**(पारीत दिनांक ०६ जानेवारी, २०२४)**

प्रस्तुतचा दावा हा वादींनी प्रतिवादींच्या सर्व तक्रारी दूर करुन वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादींचेकडून वादीस देणेकरीता तसेच दावा दाखल तारेपासून ते प्रत्यक्ष कब्जा मिळेपर्यंत नुकसानीची रक्कम म्हणून दरमहा रक्कम रु. ५०००/– प्रमाणे प्रतिवादींनी वादीना देण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात असे की, वादी ट्रस्ट हा महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार नोंद ट्रस्ट असून त्याचा नोंदणी क्रमांक ए–४५५ असा आहे. सदरच्या ट्रस्टचे मधुकर नाना गुरव हे विश्वस्त आहेत. सदरच्या ट्रस्टचे पुढीलप्रामणे नोंद

ट्रस्टी होते. अ) मधुकर नाना गुरव, ब) नारायण बाळा गुरव, क) प्रदीप रामचंद्र गुरव, ड) दत्तात्रय नाना गुरव, इ) अशोक नाना गुरव. सदरच्या ट्रस्टकरीता वंशपरंपरा पध्दतीने विश्वस्त येण्याची रित आहे. श्री. मधुकर नाना गुरव यांना वर नमूद विश्वस्तांनी दि. ०९/०६/२०२३ रोजी ट्रस्टच्या मिळकतीसंदर्भात वटमुखत्यापत्राने अधिकार दिलेले आहेत. तसेच, हयात विश्वस्तांनी मधुकर नाना गुरव यांना ठरावाने अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराने ट्रस्टतर्फे मधुकर नाना गुरव यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. मधुकर गुरव यांच्या नांवाची नोंद विश्वस्त म्हणून पी.टी.आर उताऱ्यावर नोंद आहे.

३. वाद मिळकत ही वादी ट्रस्टच्या मालकीची असून सदर मिळकतीच्या सिटी सर्व्हेच्या उताऱ्यामध्ये वादी ट्रस्टच्या नांवाची नोंद आहे. वादी ट्रस्टच्या मिळकतींची देखभाल व्यवस्था वगैरे विश्वस्त करीत आलेले आहेत. श्रीमती. चिंगूबाई गुरव विश्वस्त होती व तिचे सन १९९४ मध्ये निधन झाले आहे.

४. प्रतिवादींनी सदरच्या वाद मिळकतीत अनाधिकाराने तत्कालीन विश्वस्तांच्या विरोधास न जुमानता दांडगाव्याने सन १९७० चे सुमारास घुसखोरी केली. त्यावेळी, मिळकतीस सर्व्हे नंबर होता. त्यानंतर पुढे सिटी सर्व्हे नंबर झाले आहेत. वादी ट्रस्टच्या विश्वस्तांनी जागेच्या कब्जाची मागणी केली. तथापी, त्यामध्ये प्रतिवादींच्या दांडगाव्यामुळे विश्वस्तांना यश मिळू शकले नाही. पुढे सदरच्या मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी वादीने प्रतिवादीचे विरुध्द नजरचुकीने भाडेकरु असे नमूद करुन दावा दाखल केला. तथापी, तांत्रीक स्वरुपाच्या अडचणी निर्माण झाल्यामुळे वादीने तो दावा काढून घेतला. त्यानंतर अलिकडेच

प्रतिवादींनी काही जादा क्षेत्रामध्ये अनाधिकाराने बांधकाम केले आहे. सदरच्या मिळकती नोंद ट्रस्टच्या मालकीच्या असतानाही प्रतिवादीनी खोट्या तक्रारी सांगण्यास सुरवात केली होती.

५. प्रतिवादी व अन्य काही इसमांच्या बेकायदेशीर कब्जे वहिवाटीबाबत कायदेशीर कारवाई करण्याबाबत व ट्रस्टच्या मिळकतीचे संरक्षण होण्याबाबत विश्वस्त नात्याने वादीने सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग सांगली यांचेकडे अर्ज सादर केला होता. त्या संदर्भात चौकशी होऊन मा. निरीक्षक, न्यास नोंदणी कार्यालय, सांगली यांनी मिळकतीचे अनधिकृत कब्जे वहिवाटीपासून व अतिक्रमणापासून संरक्षण होण्यासाठी सिव्हील कोर्टात दाद मागण्याबाबत वादींना निर्देश दिलेले आहेत. त्यास मा. धर्मादाय उपायुक्त, सांगली विभाग, सांगली यांनी दि. १७/०२/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कसल्याही स्वरुपाचा कायदेशीर हक्क, हितसंबंध नव्हता व नाही. प्रतिवादी हे वाद मिळकतीत अतिक्रमण करणारे इसम आहेत. त्यामुळे, प्रतिवादींच्या सर्व तक्रारी दूर करुन त्यांच्या ताब्यातील मिळकतीचा कब्जा मालकीहक्काने वादीस मिळण्यासाठी सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. सबब, वादींचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा. तसेच प्रतिवादींच्या सर्व तक्रारी दूर करुन वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादींचेकडून वादीस देवविण्यात यावा. व दाव दाखल तारखेपासून ते प्रत्यक्ष कब्जा मिळेपर्यंत नुकसानीची रक्कम म्हणून दरमहा रक्कम रु. ५०००/– प्रमाणे प्रतिवादींनी वादीना देण्याबाबत आदेश होणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादीतर्फे वादीच्या दाव्यास निशाणी क्र. १५ नुसार कैफियत दाखल

करण्यात आली व त्यांनी असे कथन केले की, वादीचा दावा खोटा व लबाडीचा असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. दाव्यात कथन केलेला मजकूर काल्पनिक व अतिरंजीत स्वरुपाचा असून प्रतिवादी त्यांचा इन्कार करीत आहेत. तसेच, वादीचा दावा आणलेल्या स्वरुपात चालू शकणारा नाही. अशाप्रकारचा दावा दाखल करणेस वादीस कोणताही कायदेशीर हक्क व अधिकर नव्हता व नाही. वाद मिळकत मूळची चिंगूबाई कोम बाबू गुरव हिचे कब्जे वहिवाटीची होती. असे असताना, सदर मिळकत प्रतिवादीचे पूर्वहक्कदार प्रल्हाद पोरे यांना वाद मिळकतीची खुलीजागा दरसाल रुपये १००/– भुई भाड्याने इमारत बांधून राहणेसाठी सुमारे ५५ ते ६० वर्षापूर्वी दिलेली होती व आहे. त्यावेळी, प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांनी या मिळकतीमध्ये लाख रुपयाच्या रक्कम खर्चून या जागेत इमारतीचे बांधकाम करुन मिळकत कायदेशीर हक्काने वहिवाटीत आलेले होते.

७. त्यानंतर, प्रतिवादी वाद मिळकतीत वहिवाटीत आलेला आहे. अशाप्रकारे, प्रतिवादी यांचे कब्जे वहिवाट चालू असताना याबाबतच्या नोंदी म्युन्सीपल रेकॉर्डला झालेल्या आहेत. या मिळकतीचा म्युनसिपल कर सुध्दा प्रतिवादी भरत आलेले आहेत. तसेच, प्रतिवादीने या मिळकतीमध्ये पाणी कनेक्शन घेतलेले आहे. अशाप्रकारे, प्रतिवादीची कब्जे वहिवाट कायदेशीररित्या चालू आहे. चिंगूबाई कोम गुरव व त्याचे वारस व प्रतिवादी त्यांचेमध्ये विश्वासाचे व सलोख्याचे संबंध होते. त्यामुळे, याबाबतचा तोंडीच करार झालेला होता व आहे. त्याने सलोख्याचे चांगले संबंध असलेने भुई भाड्याचे पावत्यांबाबत लेखीटाकी दिल्या घेतल्या नव्हत्या व नाहीत. अशारितीने प्रतिवादीची अव्याहतपणे कब्जे वहिवाट चालू आहे.

८. चिंगूबाई कोम गुरव हिने प्रतिवादीचे वडीलांना स्वतः बांधकाम कायमस्वरुपी करणेविषयी इमारत बांधणेस तोंडी परवानगी दिलेली होती. ती परवानगी कधीही परत न घेणेच्या स्वरुपाची (इररिव्होकेबल लायसन्स ) अशी होती. त्यामुळे, प्रतिवादी व त्यांचे कुटुंब या मिळकतीचा उपभोग घेत आलेले आहेत. सदरची बाब वादीने पूर्वीच्या दाव्यात कबूल केलेली आहे. तथापी, या दाव्यास अडचण येते म्हणून ''नजरचुकीने भाडेकरु म्हणून नमूद केले आहे'' असा खोटा बनाव केलेला आहे. तसे करणेस वादीस इस्टॉपल बाय कॉन्डक्ट व ॲक्वीएशन्स या तत्वाचा बाध येत आहे. खुल्या मिळकतीत प्रतिवादीचे पूर्वहक्कदार व प्रतिवादीने बांधकाम करुन कब्जे वहिवाटीत आहे. आणि अशा परिस्थितीत वादीचा कब्जा मागणीचा दिवाणी दावा चालू शकणार नाही.

९. सार्वजनिक न्यासाकडे विश्वस्त नात्याने परवानगी मागणीचा अर्ज केला होता. धर्मादाय उपायुक्तानी त्याला मान्यता दिली. दावा कलम ५ मधील मजकूर गैरलागू व खोटा आहे. प्रतिवादीस याबाबत कोणतीही नोटीस आलेली नव्हती व नाही. तसेच, प्रतिवादीस याकामी संधी न देता त्याचेविरुध्द काही हुकूम झाले असलेस ते मूलतः रद्दबातल आहेत. धर्मादाय आयुक्त व तथाकथीत विश्वस्त या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. तसेच, त्याला या दाव्यात पक्षकार म्हणून सामील केल्याशिवाय वादीचा दावा चालू शकणार नाही अशी वादीची वैकल्पीक तक्रार आहे. प्रल्हाद पोरे यांचे मृत्यूनंतर मिळकत त्यांची प्रतिवादी पत्नी, दोन मुले व मुली यांच्याकडे वारसाहक्काने वहिवाटीस आलेली आहे. त्यालाही या दाव्याचे कामी पार्टी केल्याशिवाय वादीचा दावा चालू शकरणार नाही. त्यामुळे, दाव्यास नॉन जॉईंडर

ऑफ नेसेसरी पार्टी या कायदेशीर तत्वाचा बाध येत आहे. अशाप्रकारे, वरील सर्व कारणांचा विचार होऊन वादीचा दावा खर्चासह रद्द करणेत यावा व प्रतिवादीविरुध्द खोटा दावा केला म्हणून वादीवर नुकसानी दाखल व नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु. २५,०००/– ची कॉस्ट बसविणेत यावी अशी विनंती केली आहे.

१०. वादी तर्फे ॲड. श्री. एस. ए. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

११ खालील मुद्दे माझे निदर्शनास आले व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांचे आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वाद मिळकत वादी ट्रस्टच्या मालकीची असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होय |
| २. | प्रतिवादीने वाद मिळकतीत अनाधिकाराने घुसखोरी केल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होय |
| ३ | वादी मागणी केल्याप्रमाणे वाद मिळकतीचा कब्जा प्रतिवादींकडून मिळण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ४ | वादी मागणी प्रमाणे अनुतोष ( relief ) मिळण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ४अ | दाव्याची चुकीची आकारणी करुन अपुरा कोर्ट फी स्टॅम्प दिला आहे काय ? | नाही |
| ४ब | दाव्यास आवश्यक पक्षकार या न्यायतत्वाची बाधा येते का ? | नाही |
| ४क | वादीस इस्टॉपल बाय कॉन्डक्ट या तत्वाची बाधा येते का ? | नाही |
| ५ | अंतिम आदेश व हुकूमनामा काय | अंतिम आदेशाप्रमाणे |

**१२.** दाव्याच्या अनुषंगाने वादीने पुढीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केलेले आहेत. निशाणी क्र. ४ सोबत विश्वस्तांच्या प्रोसीडींगची झेरॉक्सप्रत, धर्मादाय उपायुक्त सांगली यांचेकडील पत्राची झेरॉक्सप्रत, निशाणी क्र. ६ नुसार सि.स.नं. ११३३/जी चा उतारा, निशाणी क्र. ७ नुसार सि.स.नं. ११३३/ए चा उतारा, निशाणी क्र. ८ नुसार सि.स.नं. ११३३/जी, ११३३/ए चा एकत्रीत नकाशा, निशाणी क्र. २६ नुसार इस्लामपूर येथील रि.स.नं. ३/१ चा ७/१२ उतारा, निशाणी क्र. २७ नुसार सि.स.नं. ११३३/ए चा सि.स.उतारा, निशाणी क्र. २८ नुसार सि.स.नं. ११३३/बी चा सि.स.उतारा, निशाणी क्र. ३४ नुसार मधुकर नाना गुरव यांचा मृत्यूचा दाखला, निशाणी क्र. ३७ नुसार वादी क्र. १/१ अनिल मधुकर गुरव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र, निशाणी क्र. ३८ नुसार वादीतर्फे साक्षीदार प्रदीप रामचंद्र गुरव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र इत्यादी कागदपत्रे दाखल करुन निशाणी क्र. ४२ नुसार तोंडी पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीता –**

**१३.** वादीने त्याचा दावा सिध्द करण्याकरीता त्याचा स्वतःचा पुरावा नि. ३७ प्रमाणे नमूद करुन वाद कथनाप्रमाणे जशाच्या तसा नमूद केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, वाद मिळकत ही ट्रस्टच्या मालकीची असून सदरच्या ट्रस्टचे वादीचे वडील मधुकर नाना गुरव हे ट्रस्टी होते व त्या अधिकाराने त्यांनी ट्रस्टतर्फे दावा दाखल केला आहे. त्यांच्या नांवाची नोंदी पी.टी.आर उताऱ्यावर आहे. परंतु, त्यांचा मृत्यू झाल्यामुळे ट्रस्टकरीता वंशपरंपरा तरतूदीप्रमाणे ट्रस्टी नेमण्याची तरतूद आहे. त्यामुळे, मधुकर गुरव यांच्या मृत्यूनंतर आम्हा

दोघा वादींना विश्वस्त होण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. त्यानुसार, सांगली येथील सहा. धर्मादाय आयुक्त यांचे न्यायालयात बदल अर्ज नं. ५४३/२०२० नुसार त्यांची नांवे विश्वस्त म्हणून नोंद होण्याकरीता दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे.

**१४.** वादीच्या विधीज्ञातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रस्तुतच्या प्रकरणात त्यांनी नि. क्र. ४० नुसार निरीक्षक अहवाल दाखल केलेला आहे. सदरचा निरीक्षक अहवाल हा धर्मादाय उपायुक्त सांगली यांनी दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्या इस्लामपूरच्यारहिवाशी असून सि.स.नं. ११३३ मधील म्युनिसिपल घर क्र. १५२८ या मिळकतीच्या त्या भोगवटादार आहेत. सदर मिळकतीमध्ये ते ६० ते ६५ वर्षे रहात आहेत. त्याबाबतचा नगरपालिकेचा कर त्या भरत आहेत. सदरची मिळकत ही मूळ मालक यांनी राहण्यासाठी घर बांधून तोंडी परवानगीने दिली होती. त्यानंतर, त्यांनी पक्या स्वरुपाचे बांधकाम करुन रहात आहेत. परंतु, त्याबाबत कोणताही कागद जाबदार यांनी सादर केलेला नाही. तसेच, न्यासाची मिळकत ही भाडेतत्वार देता येत नाही हा कायद्याचा नियम आहे. तसेच जाबदार हे सदर जागेत कुळ अगर अन्य अधिकाराने नाहीत. तसेच, ७/१२ व पीटीआर उताऱ्यास त्यांच्या नांवाची नोंद कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे, त्यांना धर्मादाय उपायुक्त यांनी निर्देश देऊन न्यासाच्या मिळकतीचे अनाधिकृत कब्जे वहिवाटीपासून व अतिक्रणापासून संरक्षासाठी दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचे आदेश दिले.

**१५.** त्यामुळे, सदरच्या निरीक्षक अहवालाचे अवलोकन केले. त्यामध्ये कलावती प्रल्हाद पोरे ह्या वाद मिळकतीच्या भोगवटादार आहेत व त्यामध्ये त्या मागील ६० ते ६५

वर्षापासून भाडेतत्वावर रहात आहेत. तसेच त्या नगरपालिकेचा कर भरत आहेत. सदरची मिळकत ही मूळ मालक चिंगुबाई गुरव हिने त्यांना कायमस्वरुपी बांधकाम करण्यास तोंडी परवानगी दिली होती. परंतु, त्यांनी वाद मिळकतीवर वहिवाटीबाबत म्युनसिपल रेकॉर्ड दाखल केलेले नाही. तसेच, भाडेकराराबाबतचा कोणताही कागद दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे, वादीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादाप्रमाणे महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट १९५० चे कलम ३६ प्रमाणे न्यासाची मिळकत ही शेतमिळकती व्यतिरिक्त इतर मिळकत असेल तर ३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी भाड्याने देता येत नाही. त्याकरीता सहा. धर्मादाय आयुक्त यांची परवानगी लागते. अशाप्रकारे, प्रतिवादीयांचा वाद मिहकतीवर कशाप्रकारे ताबा आहे ही बाब त्यांनी पुरावा देऊन सिध्द केलेली नाही.

**१६.** याउलट, वादीने त्याच्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ निशाणी क्र. ६ ते ८ प्रमाणे उतारे दाखल केले आहेत. त्यामध्ये वाद मिळकत ही यमाईदेवी ट्रस्च्या मालकीची असलेचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे, वादी यांनी वाद मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये भोगवटादार म्हणून यमाईदेवी ट्रस्टचे नांव आढळून येते. तसेच, यमाईदेवी ट्रस्टची पब्लीक ट्रस्ट रजिस्ट्रेशन कार्यालयामध्ये ए–४५५ सांगली याठिकाणी दस्तऐवज झाल्याची नोंद आहे. त्यावरुन पूर्वी मधुकर नाना गुरव हे विश्वस्त होते असे स्पष्ट होते. अशाप्रकारे, यमाईदेवी ट्रस्टची वाद मिळकतीवर मालकीहक्काने कब्जे वहिवाट असल्याचे निष्पन्न होते.

१७. वादींनी वाद मिळकती यमाईदेवी ट्रस्टच्या मालकीची असल्याचे सिध्द केलेले आहे. त्याचप्रमाणे वाद मिळकतीवर प्रतिवादी यांनी अनाधिकृतपणे ताबा आहे असे सिध्द केलेले आहे. अशाप्रकारे, मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ व ४ करीता –**

१८. वादी यांनी वाद मिळकतीवर त्यांचा यमाईदेवी ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून मालकीहक्काने कब्जे वहिवाट असल्याचे सिध्द केले आहे. म्हणून ते वाद मिळकतीचा कब्जा मिळण्यास पात्र आहेत. तसेच, वादी यांनी प्रतिवादी हे वाद मिळकतीवर अनाधिकृतपणे ताबा करुन रहात असल्यामुळे त्यांच्याकडून दावा दाखल तारखेपासून प्रत्यक्ष कब्जा मिळेपर्यंत दरमहा रक्कम रु. ५०००/– ची मागणी केली आहे. सदरची मिळकत ही सुमारे ४८९ चौ.फूट एवढी आहे. सदरची मिळकत ही मौजे इस्लामपूर च्या कार्यक्षेत्रात येते. सदरचा भाग हा ग्रामीण भाग असून एवढी मिळकत भाड्याने दिल्यास अंदाजे दरमहा रक्कम रु. ५०००/– एवढे सहज भाडे मिळू शकते. त्यामुळे, वादी यांना वाद मिळकतीचा दरमहा रक्कम रु. ५०००/– एवढी नुकसान भरपाई मिळणे न्यायोचित होईल. तसेच, प्रतिवादी यांचा त्या मिळकतीवर अनधिकृत ताबा आहे. त्यामुळे वादी हे प्रतिवादीकडून दरमहा रक्कम रु. ५०००/– दावा दाखल तारखेपासून प्रत्यक्ष कब्जा मिळेपर्यंत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

<u>**मुद्दा क्र. ४अ करीता –**</u>

१९. प्रस्तुतचा मुद्दा सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादी यांच्यावर आहे. परंतु, प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतच्या अनुषंगाने कुठल्याही प्रकारचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे, वादी यांनी दाव्याची केलेली आकारणी कशाप्रकारे चुकीची आहे हे समजून येत नाही.

त्यामुळे, मुद्दा क्र. ४अ चे उत्तर नकारार्थी नोंदतव आहे.

**मुद्दा क्र. ४ब करीता –**

२०. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे, धर्मादाय आयुक्त व तथाकथीत विश्वस्त या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्याचप्रमाणे, प्रल्हाद पोरे यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी पत्नी, दोन मुले यांच्याकडे वारसा हक्काने वहिवाट आलेली आहे. त्यामुळे, त्यांना प्रस्तुतच्या दाव्यात पक्षकार म्हणून सामील केलेशिवाय वादीचा दावा चालू शकणार नाही. परंतु, प्रतिवादीची पत्नी व मुलाला प्रस्तुतच्या प्रकरणात सामील करण्यात आलेले आहे. म्हणून प्रस्तुतच्या दाव्यास आवश्यक पक्षकार या तत्वाची बाधा येणार नाही.

२१. प्रस्तुतच्या दाव्याला धर्मादाय उपायुक्त सांगली यांनी मंजुरी दिलेली आहे. तसेच, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी यांच्याकडून वाद मिळकतीच्या कब्जाची मागणी केलेली आहे. तसेच, प्रस्तुतच्या प्रकरणात दोन्ही विश्वस्त हे वादी म्हणून सामील आहेत. वादीच्या म्हणण्यानुसार त्यांचे वडील हे पूर्वी विश्वस्त होते व वारस म्हणून आजरोजी ते विश्वस्त आहेत. त्याबाबत त्यांच्या नांवाची नोंद होण्याकरीता त्यांनी सहा. धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अर्ज केला आहे तो प्रलंबित आहे. अशाप्रकारे, प्रस्तुतच्या दाव्यास आवश्यक पक्षकार या तत्वाची बाधा प्राप्त होणार नाही. म्हणून मुद्दा क्र. ४ ब चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र. ४क करीता –**

२२. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे चिंगुबाई कोम गुरव हिने प्रतिवादीच्या पतीला स्वतः बांधकाम करणेविषयी इमारत बांधण्यास तोंडी परवानगी दिली होती. ती परवानगी कधीही परत न घेण्याच्या स्वरुपाची होती. त्यामुळे, प्रतिवादी व त्याचे कुटुंब सदर मिळकतीचा

उपभोग घेत आलेले आहेत. सदरची बाब वादीने पूर्वीच्या दाव्यात कबूल केली आहे. तथापी, या दाव्यास अडचण येते म्हणून नजरचुकीने भाडेकरु असे नमूद केले आहे असा खोटा बनाव केला आहे. तसे करण्यास वादीस एस्टॉपल बाय कंडक्ट या तत्वाची बाधा येते. खुल्या मिळकतीत प्रतिवादीचे पूर्वहक्कदार व प्रतिवादीने बांधकाम करुन त्यांची दावा मिळकतीत कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे, वादीचा कब्जा मागण्याचा दावा चालू शकत नाही. परंतु, प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादी यांनी कुठल्याही प्रकारचा पुरावा दाखल करुन त्यांना चिंगुबाई कोम गुरव हिने इमारत बांधणेसाठी तोंडी परवानगी दिली होती. सदरची परवानगी ही कायमस्वरुपाची होती या बाबी सिध्द केलेल्या नाहीत. अशाप्रकारे मुद्दा क्र. ४क चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

<u>मुद्दा क्र. ५ करीता –</u>

**२३.** वादी यांनी त्यांचा दावा सिध्द केल्यामुळे ते प्रतिवादीकडून दाव्याचा खर्च मिळण्यास पात्र आहेत. अशाप्रकारे, मुद्दा क्र. १ ते ४क च्या उत्तरांच्या अनुषंगाने मुद्दा क्र. ५ च्या उत्तराच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना असा आदेश देणेत येतो की, त्यांनी दावा मिळकतीचा ताबा हा वादी यांना यमाईदेवी ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून प्रस्तुतच्या आदेशापासून १ महिन्याच्या आत परत करावा.

३. प्रतिवादींनी वादी यांना दावा दाखल तारखेपासून ते प्रत्यक्ष कब्जा मिळेपर्यंत नुकसान भरपाई म्हणून दरमहा रक्कम रु. ५०००/– द्यावेत.

४. त्याप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

इस्लामपूर

दिनांक ०६/०१/२०२४

सही /---

(जगन्नाथ गुजेबा वाघ )

सह.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

इस्लामपूर, जि. सांगली.

CERTIFICATE

I affirm that the contents of this Pdf file Judgment is same word as per original Judgment.

Name of Stenographer :- Shri. M. S. Gondkar

Court Name :- J. G. Wagh

Jt. Civil Judge (J.D) and
J.M.F.C., Islampur.

Date of decision :- 06.01.2024

Judgment signed by PO on :- 16.01.2024

Judgment uploaded on :- 16.01.2024